सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११**

# मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३

**(दिनांक ६ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)**

Bombay Act No. XI of 1953

# The Bombay Cinemas (Regulation) Act, 1953

*( As modified upto 6th July, 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[**किंमत** : रु. ५.००]

# मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ३ |
| २. | व्याख्या. | ४ |
| ३. | चलचित्रकाद्वारे चित्रपट दाखवण्यासाठी लायसन असणे. | ४ |
| ४. | लायसन प्राधिकारी. | ४ |
| ५. | लायसन प्राधिकाऱ्याच्या अधिकारांवरील निर्बंध. | ४ |
| ६. | विवक्षित बाबतीत चित्रपट दाखविणे स्थगित करण्याचा राज्य शासनाचा किंवा लायसन प्राधिकाऱ्याचा अधिकार. | ५ |
| ७. | अधिनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती. | ६ |
| ८. | लायसन रद्द किंवा निलंबित करण्याचा अधिकार. | ७ |
| ८अ. | अपील. | ८ |
| ८ब. | पुनरीक्षण. | ८ |
| ८क. | अधिकारांचे प्रत्यायोजन. | ८ |
| ९. | नियम करण्याचा अधिकार. | ८ |
| १०. | सूट देण्याचा अधिकार. | ९ |
| ११. | सन १९१८ चा अधिनियम क्रमांक दोन याचे निरसन. | १० |
| १२. | आणखी निरसन व व्यावृत्ती. | १० |

# सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११[1]

## [ मुंबई सिनेमा ( विनियमन ) अधिनियम, १९५३ † ]

**(या अधिनियमास, राज्यपालांची अनुमती दिनांक १५ एप्रिल, १९५३ रोजी मिळाली. ही अनुमती, दिनांक १७ एप्रिल, १९५३ रोजी मुंबई शासन राजपत्र, भाग ४ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.)**

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ (१ डिसेंबर, १९७५)*

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ (५ ऑगस्ट, १९७६)*

सन १९८७ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (१ जानेवारी, १९८७)*

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (२६ ऑगस्ट, १९९१)*

**[२] [ महाराष्ट्र राज्यात ] चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखविण्याचे विनियमन करण्याची आणि चलचित्रपट ज्या जागी दाखविण्यात येतात त्या जागांना लायसन देण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [२] [ महाराष्ट्र राज्यात ] चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखविण्याचे विनियमन करण्यासाठी आणि चलचित्रपट ज्या जागी दाखविण्यात येतात त्या जागांना लायसन देण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[३] [ (२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.]

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १९५२.भाग पाच, पृष्ठ २२५ (इंग्रजी) पहा.

† हा अधिनियम उर्वरित महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात आला आणि अशा प्रकारे लागू केल्याच्या सामर्थ्याने तो महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित भागात अंमलात राहील (सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ पहा).

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची दिनांक दर्शविते.

२. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये "मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ (एक) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोट कलम (२) दाखल करण्यात आले.

(३). तो, [१][ पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात], राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेअन्वये [२][ नेमून देईल] अशा दिनांकास अंमलात देईल [३][ आणि महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित भागात तो, मुंबई सिनेमा (विनियमन) (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० याच्या प्रारंभापासून अंमलात येईल.] १९६० चा महा. १२.

व्याख्या. **२.** विषयात किंवा संदर्भात प्रतिकूल असे काही नसल्यास, या अधिनियमात,–

(क) '' चलचित्रक '' या संज्ञेमध्ये चलचित्रे किंवा चित्रमालिका दाखविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही उपकरणसंचाचा समावेश होतो ;

(ख) '' लायसन प्राधिकारी '' याचा अर्थ, कलम ४ खाली लायसन देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेला प्राधिकारी, असा आहे ;

(ग) '' जागा '' या संज्ञेमध्ये घर, इमारत, तंबू आणि कोणत्याही वर्णनाची वाहतूक-मग ती समुद्र-मार्गाने असो, जमिनीच्या मार्गाने असो किंवा हवाई-मार्गाने असो-यांचा समावेश होतो ;

(घ) '' विहित '' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये विहित केलेले, असा आहे ;

चलचित्रकाद्वारे चित्रपट दाखवण्यासाठी लायसन असणे. **३.** या अधिनियमामध्ये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखाली लायसन दिलेल्या जागेव्यतिरिक्त इतर कोणत्याही जागेत किंवा अशा लायसनअन्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्ती आणि निर्बंध यांस अनुसरून असेल त्याहून अन्यथा चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखवणार नाही.

लायसन प्राधिकारी. **४.** या अधिनियमाखाली लायसन देण्याचा अधिकार असलेला प्राधिकारी पुढीलप्रमाणे असेल-

(एक) बृहन्मुंबईत, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई ;

(दोन) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, कलम ७ खाली ज्यासाठी पोलीस आयुक्त नेमण्यात आला असेल अशा इतर क्षेत्रात असा आयुक्त ; आणि १९५१ चा मुंबई २२.

(तीन) इतरत्र, जिल्हा दंडाधिकारी :

परंतु, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेअन्वये संपूर्ण [३][ महाराष्ट्र राज्यासाठी] किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी ते अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा इतर प्राधिकाऱ्याची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी लायसन प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

लायसन प्राधिकाऱ्याच्या अधिकारांवरील निर्बंध. **५.** (१) लायसन प्राधिकारी, खाली दिलेल्या गोष्टींसंबंधी त्याची खात्री झाल्याखेरीज, या अधिनियमाखाली लायसन देणार नाही :––

(क) या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांचे बहुतांश अनुपालन करण्यात आले आहे ; आणि

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४ (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये ' नेमून देईल ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये '' महाराष्ट्र राज्याच्या संबंध मुंबई प्रदेशासाठी '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) ज्या जागेच्या संबंधात लायसन द्यावयाचे असेल त्या जागेत चित्रपट पहावयास येणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेविषयी पुरेशी सावधगिरी घेण्यात आली आहे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, लायसन प्राधिकाऱ्यास [१][राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने], त्या प्राधिकाऱ्याच्या मते योग्य असतील अशा व्यक्तींना विहित करण्यात येईल [२][अशी फी दिल्यानंतर] आणि अशा अटींवर व शर्तींवर आणि अशा निर्बंधांना अधीन राहून, या अधिनियमाखाली लायसने देता येतील [३][किंवा कोणतेही लायसन देण्याचे नाकारण्याची आपली कारणे लेखी नमूद करून तसे करता येईल.]

(३) राज्य शासनाला, विज्ञानविषयक चित्रपट, शैक्षणिक प्रयोजनांच्या उद्देशाने काढलेले चित्रपट, वार्तापट आणि चालू घडामोडीविषयीचे चित्रपट, माहितीपट, किंवा देशी चित्रपट दाखविण्यास पुरेशी संधी मिळावी म्हणून कोणताही चित्रपट किंवा कोणत्याही वर्गाचे चित्रपट दाखवण्याच्या प्रयोजनासाठी सर्वसाधारणपणे लायसनधारकांना किंवा कोणत्याही विशिष्ट लायसनधारकाला वेळोवेळी निदेश देता येतील आणि असे निदेश देण्यात आले असतील अशा बाबतीत, असे निदेश हे, लायसन ज्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीन राहून, देण्यात आले असेल त्यांच्या भरीला असलेल्या शर्ती व निर्बंध असल्याचे मानण्यात येईल.

विवक्षित बाबतीत चित्रपट दाखविणे स्थगित करण्याचा राज्य शासनाचा किंवा लायसन प्राधिकाऱ्याचा अधिकार.

**६.** (१) राज्य शासनास संपूर्ण [४][[५][महाराष्ट्र राज्याच्या]] किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संबंधात किंवा लायसन प्राधिकाऱ्यास आपल्या अधिकारितेमधील क्षेत्राच्या बाबतीत, जाहीर रीतीने दाखविण्यात येणाऱ्या कोणत्याही चित्रपटामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेचा भंग होण्याचा संभव आहे असे त्याचे मत असेल, तर, तो चित्रपट दाखविणे आदेशाद्वारे स्थगित करता येईल आणि अशा स्थगित केल्याच्या कालावधीत [६][आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये] तो चित्रपट अप्रमाणित असल्याचे मानण्यात येईल.

(२) लायसन प्राधिकाऱ्याने पोट-कलम (१) खाली आदेश दिल्यानंतर तो, त्याची एक प्रत, त्याच्या कारणांच्या निवेदनासह ताबडतोब राज्य शासनाकडे अग्रेषित करील आणि राज्य शासन, एकतर आदेश कायम करील किंवा तो रद्द करील.

---

१. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

३. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ६ (दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४. मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६, अनुसूचीअन्वये '' राज्याच्या '' या मजकुराऐवजी '' महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या '' हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक १२ कलम ७ अन्वये '' महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६, अनुसूचीअन्वये '' राज्यामध्ये, भागामध्ये किंवा यथास्थिती क्षेत्रामध्ये '' या मजकूराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (१) खाली दिलेला आदेश, राज्य शासनाने पोट-कलम (२) खाली तो निर्भावित केला नसल्यास, त्याच्या दिनांकापासून दोन महिनेपर्यंतच्या कालावधीसाठी अंमलात असेल, मात्र, राज्य शासनाला, तो आदेश अंमलात असण्याचे चालू रहावे असे त्याचे मत असेल तर, त्याला योग्य वाटेल अशा आणखी कालावधीसाठी अशा निलंबनाचा कालावधी वेळोवेळी वाढविता येईल.

अधिनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

[१][७. [२][(१)] एखाद्या चलचित्रकाचा किंवा या अधिनियमाखाली लायसन देण्यात आलेल्या कोणत्याही जागेचा, या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली केलेले नियम यांचे किंवा ज्या शर्तीवर व निर्बंधांवर किंवा त्यांच्या अधीन राहून या अधिनियमाखाली कोणतेही लायसन देण्यात आले असेल अशा शर्तीचे व निर्बंधांचे उल्लंघन करून उपयोग करण्यात आला असेल [३][किंवा ज्या जागेचे या अधिनियमान्वये देण्यात आलेले लायसन कलम ८ अन्वये रद्द किंवा निलंबित करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून चलचित्रकाचा उपयोग करण्यात आला असेल ] तर किंवा चलचित्रक जिच्या ताब्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती, कलम १० खाली काढलेल्या माफी देण्याबाबतच्या आदेशाद्वारे लादलेल्या कोणत्याही शर्तीचे किंवा निर्बंधाचे उल्लंघन करील तर, तो मालक, किंवा चलचित्रक जिच्या ताब्यात असेल अशी व्यक्ती किंवा जागेचा भोगवटादार तसेच, जिला लायसन देण्यात आले असेल अशा व्यक्तीचे व्यवस्थापक, कर्मचारी किंवा अभिकर्ते हे अपराधाबद्दल दोषी असतील ; आणि अपराधसिद्धीनंतर [४][त्यांना तीन महिनेपर्यंत वाढवता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील ; आणि अपराध करण्याचे चालू ठेवण्यात आले असेल त्या बाबतीत, असा पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर असा अपराध करण्याचे चालू राहील त्या कालावधीत प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या द्रव्य-दंडाची शिक्षा होईल :]

परंतु, जिला लायसन देण्यात आले असेल अशी व्यक्ती, तिच्या नोकरीत असलेल्या किंवा तिच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केलेला कोणताही अपराध, आपल्या नकळत किंवा आपल्या संमतीशिवाय घडला असल्याचे आणि तो कर्मचारी किंवा अभिकर्ता आपल्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने काम करीत नसल्याचे आणि असा अपराध घडण्यास किंवा तो चालू राहण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपण तत्परता दाखवली असल्याचे सिद्ध करील तर, ती व्यक्ती, उपरोक्त अपराधाबद्दल दोषी असणार नाही.]

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये मूळ कलम ७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२. सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये कलम ७ ला त्यातील पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक ३४, कलम २ अन्वये " त्यांना पराकाष्ठा " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " शिक्षा होईल " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (२) या अधिनियमाखालील अपराधांची दखल घेणाऱ्या न्यायालयाला आवश्यक वाटेल अशी साक्ष घेतल्यानंतर जर त्यास असे वाटले की, आरोपी व्यक्ती या अधिनियमान्वये देण्यात येणाऱ्या लायसनविना किंवा अशा लायसनद्वारे किंवा कलम १० अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तींचे व निर्बंधांचे उल्लंघन करून किंवा कलम ८ अन्वये लायसन रद्द किंवा निलंबित करण्यात आलेले असताना, कोणत्याही जागेमध्ये किंवा जागेवर चलचित्रकाद्वारे प्रदर्शन करीत होती, तर न्यायालय ती तक्रार अंतिमरित्या निकालात निघेपर्यंत,—

(क) ज्या जागेमध्ये किंवा जागेवर असे प्रदर्शन केले जात होते त्या जागेला सील ठोकण्यात यावे, आणि

(ख) असा चलचित्रक व त्यासोबत काही यंत्रसामग्री, उपयंत्रे व उपकरण संच असल्यास तोही जप्त करून लायसन प्राधिकाऱ्याच्या सुरक्षित ताब्यात ठेवण्यात यावा, असा आदेश देईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये जेव्हा न्यायालय जागेला सील ठोकण्याचा आणि चलचित्रक व यंत्रसामग्री, उपयंत्रे व उपकरण संच जप्त करण्याचा आदेश काढील, त्यावेळी त्या आदेशामध्ये असा निदेश देईल की, दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यासाठी पोलीस, लायसन प्राधिकाऱ्यास आवश्यक वाटेल ती मदत करतील.

(४) जेव्हा कोणतीही अशी आरोपी व्यक्ती अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाकरिता सिद्धापराध ठरवण्यात येईल. तेव्हा पोट-कलम (२) अन्वये जप्त केलेला चलचित्रक व यंत्रसामग्री, उपयंत्रे व उपकरण संच, राज्य शासनाकडे समपहृत करण्यात येईल आणि एखाद्या प्रकरणामध्ये अशी व्यक्ती दोषमुक्त किंवा मुक्त करण्यात आली तर, लायसन प्राधिकारी,पोट-कलम (१) अन्वये सील केलेल्या जागेचे सील काढून टाकील आणि जप्त केलेला आणि लायसन प्राधिकाऱ्याच्या सुरक्षित ताब्यात ठेवलेला चलचित्रक, यंत्रसामग्री, उपयंत्रे व उपकरण संच त्याला परत करील. ".]

लायसन रद्द किंवा निलंबित करण्याचा अधिकार.

८. लायसनधारक, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांचे किंवा ज्या शर्तींवर अथवा निर्बंधांवर किंवा त्यांच्या अधीन राहून त्याला या अधिनियमाखाली लायसन देण्यात आले असेल अशा कोणत्याही शर्तींचे किंवा निर्बंधांचे [२][किंवा कलम १० खाली काढलेल्या माफी देण्याबाबतच्या आदेशाद्वारे लादलेल्या कोणत्याही शर्तींचे किंवा निर्बंधांचे ] उल्लंघन करील, किंवा या अधिनियमाच्या कलम ७ खाली किंवा चलचित्रक अधिनियम, १९५२ याच्या कलम ७ खाली त्याला सिद्धापराध ठरवण्यात आले असेल अशा वेळी [३][ किंवा मुंबई करमणूक कर अधिनियम, १९२३ याच्या कलम ९ड खाली जिल्हाधिकाऱ्याने केलेली शिफारस मिळाल्यावर ], [४][ लायसन प्राधिकाऱ्याला आदेशाद्वारे लायसन रद्द करता

१९५२ चा ३७. १९२३ चा मुंबई १.

१. वरील अधिनियमाच्या कलम २ (ख) अन्वये पोट-कलमे (२), (३), (४) जादा दाखल करण्यात आली.

२. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ (अ) अन्वये " लायसन प्राधिकारी लायसन रद्द करू शकेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

येईल किंवा त्याला योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत ते निलंबित करता येईल] [१][ मात्र असा आदेश, त्याविरुद्ध अपील करण्यासाठी विहित केलेला कालावधी संपेपर्यंत परिणामक होणार नाही : ]

[२][ परंतु, लायसनधारकाला कारण दाखवण्याची वाजवी नोटीस देण्यात आल्याखेरीज कोणतेही लायसन रद्द किंवा निलंबित करण्यात येणार नाही.]

अपील.

[३][ **८. क** लायसन प्राधिकाऱ्याने लायसन देण्यास नकार देणारा किंवा कलम ८ खाली कोणतेही लायसन रद्द करणारा किंवा निलंबित करणारा आदेश काढल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला विहित करण्यात येईल अशा कालावधीत, राज्य शासनाकडे अपील करता येईल; आणि असे अपील करण्यात आल्यावर राज्य शासन आपणास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश काढील आणि असा आदेश हा अंतिम असेल.

पुनरीक्षण.

**८. ख** राज्य शासनास, एकतर स्वतः होऊन किंवा व्यथित व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा कालावधीत अर्ज केल्यावर, लायसन प्राधिकाऱ्याने या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही आदेशाचे अभिलेख मागवून घेता येतील व त्यांची तपासणी करता येईल आणि त्यावर आपणास न्याय व योग्य वाटतील असे आदेश देता येतील :

परंतु,—

(एक) या कलमाखाली पुनरीक्षणासाठी केलेला अर्ज फेटाळण्यात येईल तेव्हा राज्य शासन अर्ज का फेटाळण्यात आला याबाबतची त्याची कारणे नमूद करील; आणि

(दोन) ज्या कोणत्याही आदेशामुळे कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा कोणताही आदेश देण्यापूर्वी त्या व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

**८ ग.** राज्य शासनाला, त्याला लादणे योग्य वाटेल अशा निर्बंधांच्या शर्तींच्या अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कलम ८क किंवा ८ख खालील आपले अधिकार आयुक्ताकडे प्रत्यायोजित करता येतील.]

नियम करण्याचा अधिकार.

**९.** (१) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध येऊ न देता, अशा नियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(क) ज्या कार्यपद्धतीत अनुसरून लायसन मिळविता येईल ती कार्यपद्धती आणि ज्या अटी, शर्ती आणि निर्बंध, कोणतेही असल्यास, यांना अनुसरून या अधिनियमाखाली लायसन देता येईल त्या अटी, शर्ती व निर्बंध विहित करणे ;

[४][ (क-एक) कलम ८क खालील अपील किंवा कलम ८ख खालील पुनरीक्षण अर्ज ज्या कालावधीत करता येईल तो कालावधी विहित करणे ;]

---

१. सन १९७५ चा महा. अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. सन १९६० चा महा. अधिनियम क्रमांक १२, कलम ८ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये कलमे ८क, ८ख, आणि ८ग समाविष्ट करण्यात आली.

४. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १० (१) अन्वये खंड (क-एक) समाविष्ट करण्यात आला.

(ख) सार्वजनिक सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने चलचित्रपट दाखवण्याचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणे;

(ग) या अधिनियमाखाली लायसन देण्यात आलेल्या जागांमध्ये प्रवेश करण्याच्या व त्यातून बाहेर पडण्याच्या मार्गाचे विनियमन करणे; आणि तेथे अशांतता होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करणे ;

(घ) या अधिनियमाखाली लायसन देण्यात आलेल्या जागेत प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या कोणत्याही तिकीटाच्या किंवा पासाच्या–मग त्याला कोणतेही नाव दिलेले असो–विक्रीचे विनियमन करणे किंवा त्यास मनाई करणे.

[१][ (३) या कलमाखाली नियम करताना, राज्य शासनाला, कोणत्याही नियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर करणाऱ्या किंवा त्यांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला [२][ अपराध सिद्ध झाल्यानंतर, कलम ७ खालील नसलेल्या अपराधाच्या बाबतीत, तीन महिनेपर्यंत वाढवता येईल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील; आणि अपराध करण्याचे चालू ठेवले असेल अशा बाबतीत, असा पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर अपराध चालू ठेवलेल्या प्रत्येक दिवसाला पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल,] अशी तरतूद करता

१८९८ चा ५. येईल. [३][ पोट-कलम (२), खंड (घ) खाली केलेल्या नियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास किंवा त्यांचे उल्लंघन केल्यास *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या अर्थांतर्गत तो दखली अपराध असेल. ]

(४) या कलमाखाली नियम करण्याचा अधिकार हा, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असेल.]

[४][ (५) या कलमाखाली केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, तीस दिवसांहून कमी नाही इतक्या कालावधीत राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरबदल करील त्या फेरबदलांच्या अधीन असतील व ते राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.]

**१०.** राज्य शासनाला [५][किंवा आयुक्ताला], लेखी आदेशाद्वारे ते [५][किंवा तो] लादील अशा शर्तींच्या आणि निर्बंधांच्या अधीन राहून एखाद्या चलचित्रकाद्वारे चित्रपट दाखविण्यास किंवा चलचित्रकाद्वारे दाखवण्याच्या चित्रपटवर्गास या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींपासून किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांपासून सूट देता येईल. सूट देण्याचा अधिकार

---

१. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ४ अन्वये ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली

२. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम २ अन्वये " त्याचेवर अपराध सिद्ध झाल्यानंतर, पराकाष्ठा, एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल असे विहित करण्याचा अधिकार आहे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १० (२) अन्वये पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

५. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सन १९७४ चा अधिनियम क्रमांक दोन) असे वाचावे.

सन १९१८ चा अधिनियम क्रमांक २ यांचे निरसन.

**११.** [१][पुनर्रचनेपूर्वीच्या *मुंबई राज्याला] लागू असलेला चलचित्रक अधिनियम, १९१८ हा चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखवण्याचे विनियमन (ज्या जागांत चलचित्रकाच्या सहाय्याने चित्रपट दाखवण्यात येतात अशा जागांना लायसन देणे धरून) करण्याशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९१८ चा २.

आणखी निरसन व व्यावृत्ती.

[२][ **१२.** मुंबई सिनेमा (विनियमन) (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० या अन्वये महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ व हैदराबाद क्षेत्रास लागू करण्यात आलेल्या या अधिनियमाच्या प्रारंभानंतर पुढील अधिनियम निरसित होतील :– १९६० चा महाराष्ट्र १२.

(एक) मध्य प्रदेश सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५२ ; १९५२ चा मध्यप्रदेश १७.

(दोन) हैदराबाद सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५२ : १९५२ चा हैदराबाद ४६.

परतु, अशा निरसनामुळे–

(क) याप्रमाणे निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याचे पूर्वीचे प्रवर्तन किंवा त्याखाली रीतसर केलेली किंवा चालवून घेतलेली कोणतीही गोष्ट; किंवा

(ख) याप्रमाणे निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याखाली संपादन केलेला किंवा प्रोद्भूत झालेला कोणताही हक्क, विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही आबंधन किंवा दायित्व; अथवा

(ग) याप्रमाणे निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याविरुद्ध केलेल्या गोष्टीमुळे ओढवून घेतलेली कोणतीही शास्ती;

यांस बाध येणार नाही; आणि मुंबई सिनेमा विनियमन (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० हा जणू काही संमत झाला नसावा त्याप्रमाणे, असा कोणताही उपरोक्त हक्क, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व किंवा शास्ती यांच्यासंबंधात कोणतेही अन्वेषण, कार्यवाही किंवा उपाययोजना सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती लादता येईल : १९६० चा महाराष्ट्र १२.

परंतु आणखी असे की, पूर्वगामी परंतुकाच्या अधीन राहून अशा प्रकारे निरसित केलेल्या कायद्यान्वये किंवा कायद्याखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कारवाई (यात कोणतीही केलेली नेमणूक, काढलेली अधिसूचना, आदेश किंवा निदेश, दिलेले लायसन किंवा केलेले नियम यांचा समावेश होतो) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींखाली केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टी अन्वये किंवा कारवाई अन्वये तिचे अधिक्रमण करण्यात आले नसेल तर आणि करण्यात येईतोपर्यंत ती अंमलात असल्याचे चालू राहील].

---

१. मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये, ''मुंबई राज्याला'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ११ अन्वये कलम १२ जादा दाखल करण्यात आले.

* ''मुंबई राज्याला'' या मजकुरात फेरबदल होणार नाही. महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अनुसूची पहा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई